# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १६ मार्च, २०१८ / फाल्गुन २५, १९३९ ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रिसोड (जि.वाशीम) येथील स्त्री रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत

**(१) * १११५२६ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशीम) येथील चिखली रोडवर २२ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या २०० खाटांच्या स्त्री रुग्णालयासाठी लागणारे मनुष्यबळ व आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या नसल्याने सदरहू स्त्री रुग्णालय सुरु करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिसोड येथील चिखली रोडवर बांधण्यात आलेल्या स्त्री रुग्णालयासाठी मनुष्यबळ व आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्यासह रुग्णालय तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

स्त्री रूग्णालय, वाशिम करीता दि. १६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये ९७ पदे मंजूर करण्यात आली आहेत. सदर रूग्णालय सुरू करण्याकरीता आवश्यक ती पदे भरण्याची तसेच साधन सामुग्री उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२) * १०७१५७ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील सर्फनाला प्रकल्प (ता.आजरा), उचंगी लघु पाटबंधारे प्रकल्प (ता.आजरा), धामणी मध्यम प्रकल्प (ता.राधानगरी) व नागणवाडी प्रकल्प (ता.भुदरगड) या बांधकामाधीन असलेल्या प्रकल्पांची कामे भूसंपादन, पुनर्वसन व निधी अभावी अनेक वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील धामणी मध्यम प्रकल्पाचे काम ७५ % पूर्ण झाले असून १२३ प्रकल्पग्रस्तांना १२० हेक्टर जमीन देय असून उर्वरीत ४३ प्रकल्पग्रस्तांना ५६ हेक्टर जमीन देय आहे, सर्फनाला, नागणवाडी, आंबेओहोळ, उचंगी येथील प्रकल्पग्रस्तांना जमिनींची मागणी प्रकल्पग्रस्तांनी विभागीय

आयुक्त यांचेकडे केली असता प्रकल्पांच्या भूसंपादन व पुनर्वसनाची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासह अपूर्णावस्थेत असलेल्या प्रकल्पांची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सर्फनाला, धामणी, नागणवाडी व उचंगी या प्रकल्पांचे भूसंपादन बहुतांशी पूर्ण असून सदर प्रकल्पांची कामे प्रामुख्याने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण न झाल्याने अपूर्णावस्थेत आहेत.

या चारही प्रकल्पांसाठी सन २०१७-१८ करिता एकूण रु. ११.६० कोटी इतका निधी उपलब्ध आहे.
(२) धामणी मध्यम प्रकल्पाचे काम ७५ % पूर्ण झाले असून एकूण २४९ प्रकल्पग्रस्तांपैकी देयपात्र १२३ प्रकल्पग्रस्तांना १२० हेक्टर जमीन देय असून यांपैकी ६९ प्रकल्पग्रस्तांना ६१ हे. जमीन वाटप करणेत आली आहे. उर्वरीत ५४ प्रकल्पग्रस्तांना ५९ हेक्टर जमीन वाटप व्हावयाची आहे.

सर्फनाला, नागणवाडी, आबेंओहोळ, उचंगी येथील प्रकल्पांचे भूसंपादन व पुनर्वसन कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.
(३) पुनर्वसनाची कार्यवाही पूर्ण झाले शिवाय प्रकल्पांची कामे करण्यास प्रकल्पग्रस्तांचा विरोध आहे. पुनर्वसनासाठी आवश्यक जमिन संपादन व वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा नायगाव (रिठी) (ता.पवनी, जि.भंडारा) येथील बंधाऱ्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याबाबत

**(३) * १०८६६३ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरभी (ता.पवनी, जि.भंडारा) ग्रामपंचायत हद्दीतील मौजा नायगाव (रिठी) येथील नाल्यावर शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या उपयोगात येण्यासाठी व भुजल पातळीत वाढ व्हावी यासाठी शासनाच्या कृषी व जलसंधारण विभागाकडून एकात्मिक पाणलोट विकास योजनेंतर्गत सिमेंट बंधारे बांधण्यात आले असून सदर बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने बंधाऱ्याला ठिकठिकाणी तडे गेल्याने पाणी सर्वत्र वाहून जात असल्याने याबाबत दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, भंडारा यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी लेखी तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर गाव हे नायगाव (रिठी) नसुन नागणगांव (रिठी) आहे. सदर बंधाऱ्याची कामे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम योजनेअंतर्गत करण्यात आलेली नसून कृषि विभागामार्फत विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत करण्यात आलेली आहेत.

(२) होय.

(३) व (४) सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये सदर बंधाऱ्यांची फुटतुट झाल्याचे आढळून आल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आनंदवाडी ते मळई, मळई शाळा ते वेल्हवाडी व पीरवाडी ते कालवी येथे रस्ता बांधण्याबाबत

**(४) * १०५२८१ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील देवगड-आनंदवाडी-गडीताम्हाणे इजिमा क्र.११ च्या एकूण २९ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी आनंदवाडी ते मळई कि.मी. १/२०० ते ४/७०० मळई शाळा ते वेल्हवाडी कि.मी. ५/३०० ते ६/४०० व पीरवाडी

ते कालवी कि.मी. ७/९०० ते १२/२०० असा एकूण ८/९०० कि.मी. अंतराचा रस्ता नसल्याने त्या परिसरातील आनंदवाडी, मळई, वेल्हवाडी, पीरवाडी, कालवी या गावातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आनंदवाडी ते मळई, मळई शाळा ते वेल्हवाडी व पीरवाडी ते कालवी असा एकूण ८/९०० कि.मी. अस्तित्वात नसलेल्या (मिसिंग) रस्त्याचे काम विनाविलंब सुरु करुन तात्काळ पूर्ण करण्यात यावे अशी त्या परिसरातील नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने देवगड-आनंदवाडी-गडीताम्हाणे इजिमा क्र.११ या रस्त्यांच्या आनंदवाडी ते मळई, मळई शाळा ते वेल्हवाडी व पीरवाडी ते कालवी रस्त्याचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत खरे आहे.

इतर जिल्हा मार्ग क्र. १५ वरील आनंदवाडी ते मळई सा.क्र. १/२०० ते ४/७०० व पीरवाडी ते कालवी सा.क्र ७/९०० ते १२/२०० ही लांबी अस्तित्वात नाही. तथापी, मळई शाळा ते वेळवाडी सा.क्र. ५/३०० ते ६/४०० मध्ये रस्ता अस्तित्वात आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित रा.मा.क्र.१७८ ते देवगड वाडातर, टेंबवली, गढीताम्हाणे या इतर जिल्हा मार्गाची प्रत्यक्षातील लांबी २६.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ७/९०० कि.मी. लांबी नगरपंचायत देवगड-जामसंडे यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

७/९०० ते १२/२०० कि.मी. लांबी जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून या लांबीमध्ये रस्ता अस्तित्वात नाही. मातीची पायवाट असून खाजगी मालकीच्या आंबा बागायतीची जमीन असल्याने सदर रस्ता करण्यासाठी जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. जमीन उपलब्ध झाल्यास योग्य त्या योजनेमध्ये जिल्हा परिषदेस सदर रस्ता करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या सर्व विभागांनी हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फत औषधे खरेदी करण्याच्या निर्णयाबाबत

**(५) * १०९१०६ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय विभागाला लागणारी औषधे हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फत खरेदी करण्याचा निर्णय घेऊन ६ महिने झाले असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यास शासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णय घेण्यात आलेला असतानाही दुसरीकडे वैद्यकीय शिक्षण विभागाला दर करारानुसार औषध खरेदी करण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हाफकीन मंडळास उर्जितावस्था प्राप्त करुन देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाचा दर करारानुसार औषधे खरेदी करण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत व सर्व विभागांना लागणारी औषधे हाफकिन कॉर्पोरेशनकडूनच खरेदी करण्याचा निर्णय प्रभावीपणे अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. येथील खरेदी कक्ष दिनांक १५.०८.२०१७ पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे आहे. तथापि, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फत प्रचलित कार्यपध्दतीनुसार खरेदी प्रक्रिया पूर्ण होवून औषधांचा पुरवठा होण्यास काही काळ लागणार असल्याने रुग्णसेवेत अडथळा येवू नये यास्तव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक १७.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये औषधी विषयक बाबींच्या संपुष्ठात आलेल्या दरकरारांना दिनांक ३१.०१.२०१८ पर्यंत किंवा हाफकिन महामंडळाकडून सुरळीत पुरवठा होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(३) राज्य शासनाच्या सर्व विभागांनी हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फतच औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे यांची खरेदी करणे बंधनकारक राहील, अशी तरतुद दिनांक १७.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यात मांजरा नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणासह कारसा पोहरेगांव बंधाऱ्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(६) * ११०१३१ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा नदीच्या खोलीकरण व रूंदीकरणासह कारसा पोहरेगांव बंधाऱ्याच्या जलयुक्त शिवार योजनेंतर्गत केलेल्या कामात कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मांजरा नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणासह कारसा पोहरेगांव बंधाऱ्याचे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत केलेले काम पूर्णपणे नियमबाह्य असून त्याची चौकशी करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही. यासंदर्भात नेमलेल्या चौकशी समितीची कार्यवाही अद्याप सुरू आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे स्तरावरून अप्पर विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवनाळा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलावांचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(७) * ११४०३१ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवनाळा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील शिवारामध्ये लघु प्रकल्पांतर्गत जलसंधारण विभागामार्फत मागील ३ वर्षापूर्वी एका पाझर तलावाचे काम करण्यात आले असुन सहा तलावांचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाझर तलावांच्या कामाला शासनामार्फत निधी वितरीत करण्यात आला असताना अद्याप तलावांचे काम पूर्ण न झाल्याने त्याभागातील जमिनीत पाणी साठा कमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पाझर तलावांच्या कामाची पाहणी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार उक्त कामासाठी निधी उपलब्ध करुन पाझर तलावांचे काम पूर्ण करण्यासह दोषी अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही. तसेच कळंब तालुक्यात मौ.देवनाळा गाव नसून मौ.देवळाली हे गाव आहे.
(२) लघु पाटबंधारे विभाग, जि.प. उस्मानाबाद अंतर्गत देवळाली ता.कळंब येथे एकूण ७ पाझर तलाव असून एका पाझर तलावाचे काम २०१४-१५ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून पूर्ण झाले आहे. उर्वरित ६ पाझर तलाव दुरूस्ती कामांसाठी निधीची तरतूद जलयुक्त शिवार अभियान २०१६-१७ मधून करण्यात आली आहे. सदर पाझर तलावांच्या दुरूस्तीची कामे प्रगतीपथावर असून मार्च, २०१८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे भादा, बोरगाव (न) (ता.औसा, जि.लातूर) व मौजे काटगाव (ता.जि.लातूर) येथील बंधारे अतिवृष्टी व पुरामुळे नादुरुस्त झाल्याबाबत

**(८) * १११६१ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भादा, बोरगाव (न) (ता.औसा, जि.लातूर) येथील कोल्हापुरी बंधारा व मौजे काटगाव (ता.जि.लातूर) येथील गॅबीयन बंधारा सन २०१६-१७ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे नादुरुस्त झाला असून बंधाऱ्याकडेच्या शेतकऱ्यांच्या जमिनीही वाहून गेल्या असून बंधाऱ्यात पाण्याचा साठा उपलब्ध नसल्याने सदर बंधाऱ्याची दुरुस्ती जलयुक्त शिवार योजनेचा निधी अथवा जिल्हा वार्षिक योजना निधीतून करण्याची मागणी लातूर ग्रामीण येथील लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने मौजे भादा, बोरगाव (न) येथील कोल्हापुरी बंधारा व मौजे काटगाव येथील गॅबीयन बंधाराच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासह बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१६-१७ मध्ये अतिवृष्टीच्या पुरामुळे नादुरूस्त झालेल्या मौ.भादा, बोरगाव (न.) ता.औसा येथील कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा व मौ.काटगाव ता.जि.लातूर येथील गॅबीयन पद्धतीच्या बंधारा दुरूस्ती प्रस्तावास जिल्हा वार्षिक योजना निधीतून प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुसंख्य नर्सिंग महाविद्यालयांनी स्वत:ची रुग्णालये न उभारल्याबाबत

**(९) * १०५६४२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरएएनएम आणि आजीएनएम या नर्सिंग अभ्यासक्रमाचे अनुक्रमे ४३७ आणि २४४ महाविद्यालय असून ती खासगी संस्थाव्दारे चालविली जातात या महाविद्यालयांना स्थापनेच्या तीन वर्षापर्यंत स्थानिक शासकीय रूग्णालयांचा वापर विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी करता येईल परंतु त्यानंतर त्यांना स्वतःचे १०० ते १५० खाटांचे रूग्णालय उभारावे लागेल असा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १८ सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुसंख्य नर्सिंग महाविद्यालयांनी रुग्णालये उभारण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वत:चे रुग्णालय नसलेल्या संस्था व नर्सिंग महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) सद्यस्थितीत १०० परिचर्या संस्थांचे मुल्यांकन करण्यात आले असून त्यापैकी त्रूटी आढळलेल्या ५८ संस्थांना त्रूटीपूर्ततेबाबत संचालक (वै.शि.) यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आली आहे. त्यापैकी समाधानकारक खुलासा प्राप्त न झालेल्या १३ संस्थांना ३ महिन्यामध्ये त्रूटीपूर्तता करण्याबाबत शासनामार्फत नोटीस देण्यात आली आहे. अद्याप कोणत्याही संस्थेची मान्यता रद्द करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील सिंचन प्रकल्पांच्या दुरुस्ती व नुतनीकरणाबाबत

**(१०) * ११२०२८ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील अंबुलगा, देगलूर ल.पा., हणेगाव ल.पा. व बिलोली तालुक्यातील दर्यापूर ल.पा. या चार सिंचन प्रकल्पाच्या दुरुस्तीचा अहवाल शासनाने दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ व २८ एप्रिल, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडून मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) उक्त अहवाल अद्यापी प्राप्त झाला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) अबुंलगा, हानेगाव व देगलूर या तीन प्रकल्पांची दुरूस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत.

दर्यापूर ल.पा.प्रकल्पाचा दुरूस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) टप्पा-२ अंतर्गत समावेश करण्यात आला आहे.

तसेच या प्रकल्पांवरील दुरूस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) अंतर्गत समाविष्ट नसलेल्या बाबींच्या दुरूस्तीची कामे विशेष दुरूस्ती अंतर्गत प्रस्तावित करण्याच्या दृष्टिने अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्सी-भगुरा-जसापुर (ता.नांदगाव खांडेश्वर, जि.अमरावती) रस्त्याची झालेली दुरवस्था

**(११) * १०६६३५ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या सार्सी-भगुरा-जसापुर (ता.नांदगाव खांडेश्वर, जि.अमरावती) ५ कि.मी. अंतराच्या डांबरी (इ.जि.मा.) रस्त्याचे काम मागील १५ वर्षापासून झाले नसल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असुन रस्त्यावरुन विद्यार्थी, रुग्ण, गावकरी व परिसरातील नागरीकांना प्रवास करताना गैरसोईचे होत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत सार्सी येथील ग्रामस्थांनी वारंवार तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे तात्काळ नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) सन २०१७-१८ मध्ये रस्ते, पुल दुरुस्ती व परिरक्षण कार्यक्रमांतर्गत खड्डे भरणे तात्पुरती दुरुस्तीच्या कामास रु. २.०० लक्ष मंजूर करण्यात आले आहेत.
(३) लेखाशिर्ष ३०५४-२०१६ जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०१८-१९ च्या कार्यक्रमामध्ये निधी उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचा समावेश करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हलसवडे, सांगवडेवाडी, सांगवडे व गडमुडशिंगी (जि.कोल्हापूर) या गावातील प्रलंबित कालव्याची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१२) * १०५४८३ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील कागल पंचतारांकित एमआयडीसी पासून हलसवडे ते सांगवडेवाडी, सांगवडे, गडमुडशिंगी पर्यंत या भागात राहणाऱ्या शेतकरी बांधवाना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी कालव्याचे काम सुरु

करण्यात आले असताना सदरहू काम गेले १२ वर्षापेक्षा जास्त काळ प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ पासून सुरू करण्यात आलेल्या या कालव्याच्या कामाला शेतकऱ्यांचा विरोध असताना देखील त्यांच्या जमिनी भूसंपादन करण्यात आल्या असून त्याबदल्यात शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यात न आल्याने शेतीवर अवलंबून असलेले अनेक शेतकरी बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्यासह संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दुधगंगा प्रकल्पाच्या डावा कालव्याच्या कि.मी. ७५ पासून सुरू होणाऱ्या कोल्हापूर शाखा कालव्याच्या लाभक्षेत्रामध्ये हलसवडे, सांगवडेवाडी, सांगवडे व गडमुडशिंगी या गावांचा समावेश असून कोल्हापूर शाखा कालव्याचे काम भूसंपादन व निधी अभावी सन २००८ पासून प्रलंबित आहे.

(२) व (३) कोल्हापूर शाखा कालव्याची एकूण लांबी २२ कि.मी. असून त्यापैकी कि.मी. १ ते ७ व कि.मी. १२ व कि.मी. १६ मध्ये कालव्याच्या भूसंपादन कामास शेतकऱ्यांचा विरोध असल्याने या भागात कालव्याचे काम करता आलेले नाही. कि.मी. ८ मधील काम पूर्ण असून कि.मी. ९ ते ११, कि.मी. १३ ते १५ व कि.मी. १७ ते २२ मधील कालव्याची कामे प्रगतीत आहेत. कोल्हापूर शाखा कालव्याकरिता एकूण ८८.१९ हे. आर जमिन आवश्यक असून त्यापैकी १४.५५ हे. आर. जमिन संपादन करून रू.११.०६ कोटी रकमेचा मोबदला वाटप करण्यात आला आहे. उर्वरित ७३.६४ हे. आर. करिता रू.७७.५५ कोटी निधी महसूल विभागाकडे जमा करण्यात आला असून, नवीन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे. कालव्याच्या उर्वरित क्षेत्रासाठी भूसंपादनाची कार्यवाही नवीन भूसंपादन कायद्यानुसार प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटण (जि.सातारा) तालुक्यातील सह्याद्रीच्या पठारावर नोंदणी नसलेल्या पवनचक्की टॉवरचा सर्व्हे करण्याबाबत

**(१३) * १०८७७५ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील सह्याद्रीच्या डोंगरपठारावर विविध पवनऊर्जा प्रकल्पाच्या कंपन्यांनी प्रकल्प उभारुन प्रत्येक कंपनीने शेकड्यामध्ये पवनचक्कीचे टॉवर उभे केले आहेत यामध्ये काही ठराविकच टॉवरची नोंदणी संबधित ग्रामपंचायतीच्या दफ्तरी करण्यात आली आहे तर अनेक टॉवरची नोंदणी विविध पवनऊर्जा कंपन्यांनी ग्रामपंचायतीच्या दफ्तरी केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार ज्या पवनचक्की कंपन्यांनी आपले टॉवर ग्रामपंचायतीच्या हद्दीत उभे केले आहेत अशा कंपन्यांनी रुपये २७ हजार ५०० प्रमाणे एका टॉवरचा एक वर्षाचा कर हा संबंधित ग्रामपंचायतीकडे ठोक अंश अनुदान रूपाने भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून पाटण तालुक्यात अद्यापपर्यंत सह्याद्रीच्या डोंगरपठारावर सुमारे २००० ते २५०० पर्यंत पवनचक्कीचे टॉवर उभे असताना पवनचक्कीच्या विविध कंपन्यांनी उभारलेल्या केवळ १०२३ पवनचक्की टॉवरची नोंद पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत विभाग यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीना मिळणाऱ्या अनुदानामध्ये घट होवून ग्रामपंचायतीचा विकास पूर्णतः थांबला असल्याने पाटण पंचायत समितीच्या ग्रामपंचायत विभागाकडे नोंद असलेल्या परंतु प्रत्यक्षात उभ्या असूनही नोंद नसलेल्या सर्व टॉवरची महसूल व ग्रामपंचायत विभाग यांनी संयुक्त सर्व्हे करुन संबधीत कंपन्यांकडून अनुदानाची वसुली करणेबाबत मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायतीकडून तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडून मागणी होवूनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३), व (४) हे खरे नाही.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील सहयाद्रीच्या पठारावर एकूण ५४ ग्रामपंचायतींच्या हद्दीत १०५९ पवन चक्क्या असून सर्व ग्रामपंचायतींनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील असलेल्या सर्व पवन चक्क्यांची नोंदणी ग्रामपंचायत दप्तरी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील तरतुदीनुसार सर्व ग्रामपंचायतींनी कर आकारणी केलेली आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८चे कलम १२५ नुसार ठोक अंशदान प्रस्तावांना मंजूरीचे अधिकार विभागीय आयुक्त यांना शासनाकडून प्रदान करण्यात आले होते. त्यानुसार आयुक्त यांच्या मंजूरीनंतर ठोक अंशदान अंमलात आणले जाते. पवन चक्की संदर्भात कोणतेही ठोक अंशदानाचे प्रस्ताव आयुक्त यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले नाहीत किंवा आयुक्त यांच्याकडून अशा प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही.

ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था असल्याने ग्रामपंचायत हद्दीमध्ये असलेल्या मिळकतींच्या नोंदी ग्रामपंचायत दप्तरी करण्यात येतात. त्यानुसार सर्व पवन चक्क्यांच्या नोंदी त्या त्या ग्रामपंचायत दप्तरी करण्यात आलेल्या असून त्यावरील कराची वसुली ग्रामपंचायतींकडून करण्यात येत आहे. त्यामुळे महसुल व ग्रामपंचायत विभागामार्फत संयुक्त सर्वे करण्याची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) येथील उपजिल्हा रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्रात आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत

**(१४) * ११०६५९ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण),**

**श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु असलेल्या ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला असताना त्याठिकाणी बांधण्यात आलेल्या शवविच्छेदन केंद्रासाठी आवश्यक असलेला तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारीवृंद अद्याप नियुक्त केला नसल्याने सदर शवविच्छेदन केंद्र बांधून पूर्ण होऊनही बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शवविच्छेदन केंद्र बांधून पूर्ण असूनही आवश्यक असलेले कर्मचारी त्याठिकाणी नियुक्त न करण्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,

ग्रामीण रुग्णालय, बदलापूर, जि.ठाणे येथे शवविच्छेदन करण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे तथापि, शवविच्छेदन गृहाची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चालू असल्यामुळे सद्यस्थितीत शवविच्छेदनाचे काम बंद आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरालगत असलेल्या गोरेवाडा प्राणी संग्रहालय परियोजनेतील १०० हेक्टर जंगल जळाल्याबाबत

**(१५) * १०६९३३ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरालगत असलेल्या गोरेवाडा प्राणी संग्रहालय परियोजनेतील १०० हेक्टर जमिनीवरील जंगल जळून खाक झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन महिन्यांमध्ये अनेकदा जंगल जळाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील वनविभागाची फायर फायटींग व्यवस्था पुर्णपणे निकामी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व या घटनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ या दोन महिन्याच्या कालावधीत नागपूर शहरालगत असलेल्या गोरेवाडा प्राणी संग्रहालय परियोजनेत लागलेल्या आगीमध्ये एकूण ९९ हेक्टर जंगलातील गवत व पालापाचोळा जळालेला आहे.
(३) हे खरे नाही.

गोरेवाडा प्रकल्पामध्ये फायर फायटिंग करिता एकूण ६ ब्लोवर व वाहनांसहीत ३ वॉटर टँकर उपलब्ध आहेत. तसेच वनविभागाची फायर फायटिंग व्यवस्था सक्षम असून जबाबदारीने आपले कर्तव्य निभावत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आष्टा दुधगांव कुंभोज (ता.मिरज, जि.सांगली) या रस्त्यासाठी वारणा नदीवर बांधलेल्या पुलाच्या जोडरस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(१६) * ११४४७३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टा दुधगांव कुंभोज (ता.मिरज, जि.सांगली) या रस्त्यासाठी वारणा नदीवर बांधलेल्या पुलाच्या जोडरस्त्याचे काम गेली दोन वर्षापासून अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारणा नदीवर बांधलेल्या पुलाच्या जोडरस्त्याचे काम अपूर्ण असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर पुलाच्या जोडरस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय खरे आहे.

तथापि पूलाच्या जोडरस्त्याच्या माती भरावयाचे काम पूर्ण झालेले आहे. खडीकाम व डांबरीकरणाचे काम करावयाचे आहे. या मातीच्या पृष्ठभागावरुन वाहतुक सुरु आहे.
(२) जोडरस्त्यासाठी आवश्यक जमिनीचे संपादनास विलंब झाल्याने काम अपूर्ण राहिले आहे.
(३) व (४) पूलाच्या जोडरस्त्यासाठी आवश्यक जमिनीचे संपादन करण्यात आले आहे. जोडरस्त्याचे उर्वरित काम खडीकरण व डांबरीकरणाचे कामासाठी कंत्राट निश्चित करण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे. निधीची उपलब्धतता व निविदेतील तरतूदीप्रमाणे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेतील कामांना प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) * ११०८६७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ अंतर्गत ५३ कामांना जलसंधारण विभागाने तांत्रिक मान्यता दिली असतांनासुध्दा या कामास अद्यापही प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तांत्रिक मान्यता मिळालेल्या कामांना जलसंधारण विभागाकडून तातडीने प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी संबधित विभागास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सावनेर तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ अंतर्गत जलसंधारण विभागाने तांत्रिक मान्यता दिलेल्या ५३ कामांना प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सन २०१५-१६ जलयुक्त शिवार अभियानांतर्गत ४ कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात आली असून सदर कामे पुर्ण करण्यात आली आहेत. विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत २ कामे पुर्ण झाली असून व ३ कामे प्रगतीपथावर आहेत. पूरसंरक्षण अंतर्गत नाला खोलीकरणाची ४ कामे व पूरसंरक्षण भिंतीच्या २ कामांना प्र. मा. प्राप्त आहेत. उर्वरित ३८ कामे विविध निधी स्त्रोतातून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खेडी, दाभा व घुस्सर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील पाझर तलावांच्या दुरूस्तीबाबत

**(१८) * १११४६२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खेडी, दाभा व घुस्सर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील पाझर तलावांच्या दुरूस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता सिंचन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेमार्फत दिनांक २७ ऑगस्ट, २०१६ व २४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पाझर तलावांची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर पाझर तलाव दुरूस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नांकित पाझर तलावांपैकी लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे अंतर्गत असलेल्या मौजे खेडी व दाभा येथील पाझर तलावांची कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे मार्फत पाहणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी

**अ) <u>मौजे खेडी</u>** येथील तलाव सुस्थितीत असून या तलावास दुरूस्तीची आवश्यकता नाही.

**ब) <u>मौजा दाभा</u>** या पाझर तलावाच्या पाहणी दरम्यान सदर तलावातून पावसाळयात गळती होत असल्याचे आढळून आले आहे. यावर उपाययोजना म्हणून तलावाच्या उर्ध्व बाजूस जलरोधी खंदक तयार करण्याची आवश्यकता आहे. सदयस्थितीत प्रस्तुत कामाची सन २०१७ - १८ च्या दरसूची नुसार अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**क) <u>मौजे घुस्सर</u>** येथे घुस्सर पाझर तलाव नसून, कोल्हापुरी पदधतीचा बंधारा आहे. सदर बंधाऱ्याचे खराब झालेले लोखंडी दरवाजे बदलणे तथा बंधाऱ्याचे वरील बाजुस संधाणक पडदी भिंत व बंधाऱ्यातील गाळ काढणे या कामांचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे दिनांक २५/०१/२०१८ रोजी प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील कोट्यवधी रूपयांच्या रक्तचंदन तस्करी प्रकरणाच्या तपासाबाबत

**(१९) * १०५७६२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहराच्या वेगवेगळया भागात माहे डिसेंबर, २०१६ ते माहे जानेवारी, २०१७ त्यादरम्यान तस्करीसाठी साठा करून ठेवलेले कोट्यवधी रूपयांचे रक्तचंदन जप्त करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी तब्बल ७ महिन्यांनी संशयित मुख्य सूत्रधारास अटक करण्यात आले परंतु चौकशी करून अन्य कोणावरही कारवाई न करता याप्रकरणाचा तपास अचानक थांबविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोट्यवधी रूपयांच्या जप्त केलेल्या रक्तचंदन प्रकरणाचा तपास थांबविण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच याप्रकरणी कोणावर कारवाई करण्यात आली आणि या तपासाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

चिपळूण वन विभागाने चिपळूण येथील गोवळकोट परिसरात दि.३०.१२.२०१६ ते ०७.०१.२०१७ या कालावधीत घातलेल्या धाडीमध्ये ४ ठिकाणी अवैध रक्तचंदन माल मिळून आला. सदर माल जप्त केला असून त्याची किंमत अंदाजे रु.१.७१ कोटी इतकी आहे.
(२) आरोपी ईसा जमालुददीन हळदे यास गुप्त बातमी वरुन पोलादपूर (जि.रायगड) बसस्थानक येथुन दि.३०.०७.२०१७ चे पहाटे ५.०० चे सुमारास सापळा रचून वनक्षेत्रपाल चिपळूण यांनी ताब्यात घेवून अटक केली. गुन्हे प्रकरणाचा तपास पुर्ण करुन ईसा जमालुददीन हळदे व इतर ४ आरोपी विरुध्द न्यायदंडाधिकारी वर्ग-१ चिपळूण यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहेत.
(३) व (४) गुन्हे प्रकरणाचा तपास थांबवलेला नसून चौकशी पुर्ण करुन न्यायदंडधिकारी वर्ग-१ चिपळूण यांचे न्यायालयात ४ गुन्हा प्रकरणी ५ आरोपीविरुध्द प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

-----------------

## श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील हरिहरेश्वर तिर्थक्षेत्रामध्ये पर्यटकांसाठी सोयी-सुविधांसह विकासाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२०) * १०५०३१ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील हरिहरेश्वर हे प्रसिध्द धार्मिक व पर्यटन स्थळ असून याठीकाणी पर्यटकांसाठी मूलभूत सोयी-सुविधा नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरिहरेश्वर येथे विकास काम करण्यासाठी तिर्थक्षेत्र विकास योजनेतून शासनाकडून रूपये ११ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून सन २००४-०५ मध्ये नबाब लेक परिसर, हरिहरेश्वर मंदिर व परिसर, धर्मशाळा व परिसर, अस्थिविसर्जन परिसर, स्मशानभूमी व परिसर, इंप्रास्ट्रक्चर, भूमिसुधारणा आणि लँडस्केपिग या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्याकरिता आतापर्यंत सुमारे १३ कोटी रुपये खर्च करण्यात आले असतानाही सदरहू कामे अद्यापही अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार हरिहरेश्वर येथे पर्यटकांसाठी मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासह अपूर्ण असलेली विकास काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाही.

(२) व (३) श्री क्षेत्र हरिहरेश्वरकरिता रू.१२१० लक्ष रकमेच्या आराखड्यास मान्यता होती. तथापि, त्यातील काही कामे सुसाध्य होत नसल्याने वगळण्यात येऊन सदर आराखडा रू.९०८.६३ लक्ष इतक्या रकमेपर्यंत सिमीत करण्यात आला. सदर आराखड्यातील धर्मशाळा व परिसराच्या ५ कामांपैकी एक काम अपूर्ण असून लँडस्केपिंगचे काम अंदाजपत्रकीय स्तरावर आहे. इतर सर्व कामे पूर्ण झाली आहेत. आतापर्यंत सदर आराखड्यातील कामांवर रू.७३३.१० लक्ष खर्च झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * ११०५४० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ लाख ८३ हजार २१७ ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची देयके कोषागारात सादर करण्यात आली असून ५ लाख ३ हजार ८३ विदयार्थ्यांची देयके अद्यापी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार उर्वरित ओबीसी विदयार्थ्यांची प्रलंबित असलेली शिष्यवृत्तीची देयके तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात ११,८५,२०५ इतके सर्व प्रवर्गाचे अर्ज प्राप्त झालेले असून १०,८५,४९३ अर्ज मंजुर करण्यात आलेले आहे. एकूण अर्जांपैकी ५२,५३१ इतके अर्ज कागदपत्रांची पुर्तता अभावी महाविद्यालय पातळीवर प्रलंबित आहेत. तसेच ३०,५३५ इतके अर्ज जिल्हा पातळीवर प्रलंबित आहेत. प्रलंबित अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सन २०१७-१८ च्या उपलब्ध आर्थिक तरतुदीमधून प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरूर (जि.बीड) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामगारांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * १०९०४५ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.बीड) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल व अकुशल कामगारांची देयके मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत शिरूर तालुक्यातील कुशल/अकुशल कामगारांची थकीत देयके तात्काळ अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) कुशल व अकुशल देयके तात्काळ अदायगी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## चोरपांग्रा ते मांडवा (ता.लोणार, जि.बुलढाणा) या रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(२३) * १०६८६५ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोरपांग्रा ते मांडवा (ता.लोणार, जि.बुलढाणा) या रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतची मागणी चोरपांग्रा व मांडवा दोन्ही गावातील नागरिकांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) व (४) चोर पांग्रा व मांडवा ही गावे अनुक्रमे प्र.जि.मा.३६ व प्र.जि.मा.१२ ने जोडलेली आहेत.

प्रश्नांकित चोरपांग्रा ते मांडवा हा रस्ता योजनाबाह्य रस्ता असल्यामुळे कोणत्याही योजनेतून सदर रस्त्याचे काम करणे शक्य नाही. त्यामुळे सदर रस्ता रस्ते विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करुन घेणेबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## एकात्मिक राज्य जल आराखड्याबाबत

**(२४) * १०७९२८ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा व पश्चिम वाहिनी खोरे या एकूण ५ खोऱ्यांचा एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करण्याचे काम सुरु असून त्यासाठी कृति गटाची स्थापना करुन नागरीक व लोकप्रतिनिधींच्या सुचना, हरकती मागविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृति गटामार्फत किती कालावधीत अहवाल शासनास सादर करण्यात येणार आहे व या जल आराखड्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, ज्या भागातील हक्काचे पाणी त्या भागालाच मिळावे तसेच गिरणा प्रकल्पासाठी पश्चिम वाहिनी नदयांचे पाणी वळवण्याची प्रमुख मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम १५ व १६ नुसार प्रत्येक नदी खोरे अभिकरणाने संबंधित खोरे व उपखोरे निहाय जलआराखडा तयार करावयाचा आहे व या आधारावर सर्व खोऱ्याचे एकात्मिकीकरण करुन एकात्मिक राज्य जल आराखडा प्रारुप तयार करुन त्यास राज्य जल मंडळ व राज्य जलपरिषदेची मान्यता घेणे अपेक्षित आहे. त्यानुसार एकात्मिक राज्य जलआराखडा गोदावरी खोरे तयार करुन त्यास दि.३०.११.२०१७ रोजी राज्य जलपरिषदेची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे इतर खोऱ्याचे जलआराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे व त्यासाठी नागरीक व लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा योग्य तो विचार करण्यात येत आहे.

समांतररित्या संपूर्ण राज्याचा एकात्मिक जलआराखडा विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृतीगटाची स्थापना करण्यात आली आहे.

(२) राज्य जलपरिषदेच्या दि. ३०.११. २०१७च्या चतुर्थ बैठकीत "राज्यातील सर्व खोऱ्यांचा" एकात्मिक राज्य जल आराखडा पूर्ण करुन त्यास राज्य जलमंडळ व राज्य जलपरिषद यांच्या मान्यतेसह दि.३१ मार्च, २०१८ पर्यन्त अंतिम करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर कृतीगटाने एकात्मिक राज्य जलआराखडा तयार करुन शासनास दि. २८.०२.२०१८ पर्यन्त शासनास सादर करावयाचा आहे. सदर एकात्मिक राज्य जल आराखडा हा सर्व खोऱ्यांचा एकत्रित एकात्मिक राज्य जल आराखडा असणार आहे.

(३) होय.

(४) संबंधित खोऱ्यांचा अभ्यास करुन खोरे निहाय जलआराखडा तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. तसेच पश्चिम वाहिनी नदयांचे अतिरिक्त पाणी गिरणा खोऱ्यात व इतर तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत एकात्मिकीकरण प्रस्तावित राज्य जल आराखडात करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खुटभाव मार्डी (ता.माण, जि.सातारा) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२५) * ११२५०१ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुटभाव मार्डी (ता.माण, जि.सातारा) या रस्त्यांचे दोन वर्षापूर्वी केलेले काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून ठिकठिकाणी रस्ता उखडला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्यामुळे अनेक अपघात या रस्त्यावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच या रस्त्याचे निष्कृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ते (४) हे खरे नाही.

प्रश्नांकित प्रजिमा ४९ ते खुटबाव या ग्रामीण मार्ग क्र.११८ ची एकूण लांबी ५.५० कि.मी. असून डांबरी पृष्ठभागाची आहे.

सन २०१६-१७ मध्ये ०/८०० ते १/९१९ कि.मी. लांबीमध्ये दोन भागात रस्त्याचे नुतनीकरण करण्यात आले. सदरची कामे मे, २०१७ व जून, २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आली असून सदरची लांबी सुस्थितीत आहे.

उर्वरीत रस्त्याची बऱ्याच कालावधीपासून दुरुस्ती झालेली नसल्याने वाहतूकीस गैरसोईचा झालेला आहे. परंतु नव्याने झालेले काम सुस्थितीत असून अंदाजपत्रकाप्रमाणे व चांगल्या रितीने मक्तेदाराने पूर्ण केलेले आहे.

उर्वरीत नादुरुस्त रस्ता निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्त करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील वाड्या वस्तींवरील सौर दिवे नादुरूस्त असल्याबाबत

**(२६) * ११०९४७ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील वाड्या वस्तींवर सौर दिवे नादुरूस्त झाले असून सौर दिवे लावलेल्या कंपन्यांनी ५ वर्ष देखभाल व दुरूस्तीची अट असतांनाही दिवे दुरुस्त केले नसल्याची बाब दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद पडलेली सौर ऊर्जेवरील दिवे तातडीने दुरूस्ती करणेबाबत नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही दुरूस्ती केली गेली नाही तसेच सौर ऊर्जेवरील दिवे संबंधित कंत्राटदार, कंपन्या यांना तातडीने दुरूस्ती करण्याबाबत शासनाकडून कोणत्याही सूचना किंवा निर्देश देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सौर दिवे दुरुस्त करण्यासह दिवे दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यामध्ये सौर दिवे नादुरूस्त असल्याबाबतची बाब निदर्शनास आली नाही, तथापि मंगळवेढा तालुक्यातील श्री संत दामाजी नगर व श्री संत चोखामेळा नगर या ग्रामपंचायतीमध्ये अनुक्रमे ३५ व २२ सौर दिवे बसविण्यात आले होते. त्यापैकी अनुक्रमे १२ व ११ सौर दिवे सद्यस्थितीत बंद आहेत. सौरपथ दिवे उभारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंपनीकडून सौरदिव्यांच्या देखभाल दुरूस्तीचा कालावधी १ वर्ष इतका होता.

(२) ते (५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या आदेश क्र.दवसू/प्र.क्र.१७९(भाग५)/अजाक-१ दिनांक ०७.०२.२०१४ अन्वये अनुसूचित जाती व नव बौदध्घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेअंतर्गत विकास

कामांना मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे सदर कामांचा निधी आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत संबंधित जिल्ह्यांना वितरीत केला. सदर विकास कामांमध्ये मंगळवेढा तालुक्यामधील श्री संत दामाजी नगर व श्री संत चोखामेळा नगर या ठिकाणी सौरपथ दिवे बसविण्याबाबतचा समावेश होता.

याकरीता सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाने मे. श्री. समर्थ विद्युत कामगार औद्योगिक सहकारी संस्था लि. यांचेकडून श्री संत दामाजी नगर व श्री संत चोखामेळा नगर या ग्रामपंचायतीमध्ये अनुक्रमे ३५ व २२ सौर दिव्याची उभारणी केली. सौरपथ दिवे उभारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे देखभाल दुरूस्तीचा कालावधी १ वर्ष इतका होता. सदर कालावधी मध्ये सौरदिवे बंद पडल्याबाबत नागरिक अथवा संबंधित ग्रामपंचायती कडून सार्वजनिक बांधकाम विभागास तक्रार प्राप्त झाली नाही. तसेच सदरचे सौरपथ दिवे दिनांक ०१.१०.२०१४ रोजी ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आले असून ताबा पावती देतेवेळी ग्रामपंचायत स्वत: देखभाल दुरूस्ती करणार असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित ग्रामपंचायतीने दिलेले आहे.

-----------------

## खरसुंडी-घाणंद (ता.आटपाडी, जि.सांगली)
## या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२७) * १०७७८५ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरसुंडी-घाणंद (ता.आटपाडी, जि.सांगली) या तीन कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असताना या रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सदर ग्रामीण मार्ग क्र.६ असून खराब झाला आहे, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.

(३) प्रश्नांकित प्र.जि.मा. २३ घाणंद खरसुंडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र ६ असून त्याची एकूण लांबी ३.२०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते २/४०० कि.मी. लांबी डाबरी पृष्ठभाग व २/४०० ते ३/२०० कि.मी. लांबी मुरमी पृष्ठभागाची आहे.

सा.क्र. २/०० ते २/४०० कि.मी. मध्ये सन २०१६-१७ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काम करण्यात आले असून सदर भाग सुस्थितीत आहे. उर्वरीत खराब रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामाचा समावेश सन २०१८-१९ च्या जिल्हा वार्षिक योजना आराखड्यात जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दादर (ता.पेण, जि.रायगड) गावाभोवती संरक्षक बंधारा बांधण्याबाबत

**(२८) * १०६४८१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (ता.पेण, जि.रायगड) गावासभोवती १८ कि.मी. संरक्षक बंधारा बांधण्याच्या कामास प्रशासकीय मंजूरी व आवश्यक निधी शासनामार्फत अथवा सीएसआर फंडामार्फत उपलब्ध करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, समुद्राचे पाणी गावात व शेतीत शिरू नये यासाठी दादर गावासभोवती बांधण्यात आलेला १८ कि.मी. चा संरक्षक बंधारा सन १९८९ साली कोकणात आलेल्या महापुरात वाहून गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापुरात बंधारा वाहून गेल्यामुळे या विभागातील सुमारे २५ एकर जमिनीवर समुद्राचे खारे पाणी शिरून शेतजमिनी नापिक होऊन शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाहून गेलेला संरक्षक बंधारा बांधणे गावकऱ्यांना अशक्य असल्याने गेले २६ वर्षे पुन्हा बंधारा बांधण्यासाठी शासनाकडे मागणी करूनसुध्दा अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दादर गावाभोवती संरक्षक बंधारा बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.

सदर विषयाबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीचे नसून अध्यक्ष, काळभैरव ॲग्रो ॲण्ड, डेव्हलेपर्स कंपनी लिमिटेड, मु.पो. दादर, ता. पेण, जि. रायगड यांनी सादर केले आहे.

(२) नाही.

क्षेत्रिय पाहणीनुसार सद्यस्थितीत सदर बंधारा मोठ्या प्रमाणावर कमकुवत झाल्याचे दिसून आले आहे. दादर ही खाजगी खारभूमी योजना असल्याने शासनामार्फत खर्च केला जात नाही.

(३) होय.

(४) नाही.

कोकणातील ६४ खाजगी खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात घेण्याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून नियोजन विभागास सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये दादर खारभूमी योजनेचा समावेश आहे.

खाजगी योजना ताब्यात घेणेच्या प्रस्तावाबाबत नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यानुसार किनारा नियमन क्षेत्र (CRZ) विषयक मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटपन्हाळा ते वाशी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२९) * १११७४३ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटपन्हाळा ते वाशी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावर अनेक अपघात घडत असून या अपघातात अनेक नागरिकांचा मृत्यू झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

अपघाताची नोंद निरंक आहे.

(२) होय.

(३) सदरचा रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र.२२ दर्जाचा असून एकूण लांबी १४.०० कि.मी. इतकी आहे. सदर १४.०० कि.मी. लांबीपैकी कि.मी.०/००० ते ०/९०० कि.मी. व ४/००० कि.मी. ते १४/००० कि.मी. लांबी देखभाल दुरूस्तीसाठी कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, कोल्हापूर यांचेकडे आहे. क्षेत्रीय देखभाल दुरूस्ती सन २०१७-१८ मधून सदर रस्त्यावर एकूण रू. ४.५० लक्ष चे काम मंजूर असून एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

०/९०० कि.मी. ते ४/००० कि.मी. ही लांबी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम यांच्या अखत्यारित आहे. सदर लांबीमध्ये तात्पुर्ती दुरूस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळाकडे रू. १०.०० लक्ष चा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच, कायमस्वरूपी दुरूस्ती निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सालई खु. (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील जिल्हा परिषद शाळा ते शिवाजी नगरपर्यंत रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३०) * १०८०७५ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालई खु. (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील जिल्हा परिषद शाळा ते शिवाजी नगर पर्यंत २ कि.मी. रस्त्याची दुरवस्था झालेली असून सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशा प्रकारची मागणी ग्रामविकास विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) सालई खु. (मोहाडी, जि.भंडारा) येथील जिल्हा परिषद शाळा ते शिवाजी नगरपर्यत हा रस्ता दोन ग्रामीण भागांमध्ये समाविष्ट आहे.

१) सालई खु. ते बपेरा जोडमार्ग तालुका सिमापर्यत रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ७९

२) सिहीरी ते सालई खु. टोली रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ४२. ग्रामीण मार्ग क्र. ७९ ची एकूण लांबी १.५० कि.मी. आहे. त्यापैकी सा.क्र. ०/०० ते ०/३०० चे खडीनुतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१६-१७ मध्ये केले आहे.

ग्रामीण मार्ग क्र. ४२ ची एकूण लांबी २.३० कि.मी. आहे. त्यापैकी सा.क्र. ०/०० ते १/५०० चे खडी नुतनीकरणाचे काम सन २०१६-१७ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आले आहे.

वरील दोनही रस्त्यांच्या उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हा परिषदेच्या अखर्चित निधीबाबत

**(३१) * १०६१६४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेचा यावर्षीचा साडेअठरा कोटींचा सेसफंड माहे मार्च, २०१८ पर्यंत खर्च करणे अपेक्षित असतांना मागील ९ महिन्यात केवळ १ कोटी रुपयांचा निधी खर्च झाला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरीत तीन महिन्यात १७ कोटी रुपयांचा खर्च करावा लागणार असल्याने सदर निधी खर्च करण्यासाठी कोणते नियोजन केले आहे,

(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह निधी खर्च करण्यासाठी नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद सेसफंड साडेअठरा कोटीचा नाही. जिल्हा परिषद सेसफंड ९ महिन्यात रु.१,१४,८७,७५८/- एवढा खर्च झाला असून उर्वरित शिल्लक निधी रु.९,३७,७८,२४२/- च्या खर्चाचे नियोजन करण्यात आलेले आहे.

-----------------

## मुंबईतील सात बालगृहांतील असुविधांबाबत

**(३२) * ११४३५३ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सात बालागृहांत तब्बल दीड हजार मुले असतानाही या बालगृहांची अपुरा निधी आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याची बाब दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बालगृहांतील कर्मचाऱ्यांची ७६ पदे रिक्त असून वर्षानुवर्षे सदर पदे भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सात बालगृहांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर पहाणीत काय आढळून आले व त्यानुसार या बालगृहांतील रिक्त पदे भरण्यासह पायभूत सुविधा वृद्धिंगत करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) चिल्ड्रेन्स एड् सोसायटीअंतर्गत संस्था/बालगृहातील माटुंगा आणि उमरखाडी येथील ७९ रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येऊन पदभरती करण्यात आली आहे. तथापि, तद्नंतर राजीनामे आणि सेवानिवृत्तीमुळे ६३ पदे रिक्त झालेली असून चिल्ड्रेन्स एड् सोसायटीमार्फत संस्थेतील रिक्त पदभरतीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

चिल्ड्रेन्स एड् सोसायटी ही स्वायत्त संस्था असून ती देणगीद्वारे निधी उभारु शकते. तसेच चिल्ड्रेन्स एड् सोसायटीतील कर्मचाऱ्यांना वेतनासाठी शासनाकडून १००% सहायक अनुदान देण्यात येते. चिल्ड्रेन्स एड् सोसायटी अंतर्गत बालगृहांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये रुपये परिपोषणसाठी रु.४८.९९ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.तर सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये परिपोषणसाठी रु.४३.९१ लक्ष आणि विद्युत देयके अदा करण्यासाठी रु.७१.८९ लक्ष एवढी तरतूद शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

डोंगरी उमरखाडी येथे नवीन इमारत बांधकामासाठी शासनाने रु.१.२० कोटी व देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी रु.१.०८ कोटी इतका निधी उपलब्ध केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३३) * ११०८१५ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची संख्या कमी असून दोनच वैद्यकीय अधिकारी दिवस-रात्र काम करीत असल्याने त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण येऊन रुग्णांच्या उपचारात विविध समस्या निर्माण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयातील रिक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर पदे भरलेली आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नार-पार-औरंगा व अंबिका या नद्यांचे पाणी तापी (गिरणा) खोऱ्यात व दमणगंगा नदीचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३४) * १०५६५१ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागातील चार मुख्य अभियंता यांचे समन्वय समितीने सन २००५ मध्ये नार-पार-औरंगा व अंबिका या पश्चिमवाहिनी नद्यांचे ३४७.२५ दलघफू पाणी तापी (गिरणा) पुर्व वाहिनी खोऱ्यात व दमणगंगा पश्चिमवाहिनी नदीचे ४०१.६९ दलघफू पाणी गोदावरी या पुर्ववाहिनी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेनुसार नार-पार-औरंगा व अंबिका या पश्चिमवाहीनी खोऱ्यातील पाणी पुर्व वाहिनी गिरणा खोऱ्यात वळविण्याच्या प्रस्तावात उपलब्ध पाण्याच्या क्षमतेची जवळपास ३० धरणे बांधून पाणी वळविणे प्रस्तावित आहे परंतु प्रस्तावित काही धरणाचे पाणी उपलब्ध प्रमाणपत्र मंजुर असलेल्या योजना प्रस्तावित असुन सदर योजनांचे सविस्तर सर्व्हेक्षण सुध्दा करण्यात आलेले आहे त्यामुळे स्थानिक वापरासाठी धरण मंजुर असलेल्या व सर्व्हेक्षण झालेल्या ठिकाणी नवीन सर्व्हेक्षण करणे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असून सदर ठिकाणी सर्व्हेक्षण करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील नार-पार-औरंगा व अंबिका या पश्चिम वाहिनी नद्यांच्या खोऱ्यातील पाणी उपसा जोड योजनेव्दारे तापी खो-यातील गिरणा उपखो-यात वळविण्याची नार-पार-गिरणा वळण योजना (३०४.६ दलघमी) प्रस्तावित आहे.

तसेच नार-पार-औरंगा व अंबिका तसेच दमणगंगा या पश्चिमवाहिनी नदयांच्या खोऱ्यातील पाणी उपसा जोड योजनेव्दारे गोदावरी खोऱ्यात वळविण्याची पार-गोदावरी वळण योजना (९७ दलघमी), दमणगंगा-वैतरणा-गोदावरी वळण योजना (२०२ दलघमी) व दमणगंगा (एकदरे)-गोदावरी (१४३ दलघमी) योजना प्रस्तावित आहेत.

या राज्यांतर्गत योजना आंतरराज्यीय दमणगंगा-पिंजाळ तसेच पार-तापी-नर्मदा या वळण योजनासोबत एकत्रितपणे राष्ट्रीय प्रकल्प म्हणुन घेणे प्रस्तावित आहे.

दमणगंगा, नार-पार-अंबिका व औरंगा खोऱ्यात जलनियोजनाबाबत दि.४.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये महासंचालक, मेरी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली चार मुख्य अभियंतांची संनियंत्रण समिती गठीत केली होती. सदर समितीने दि.२५.७.२०१६ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार नार-पार-औरंगा व अंबिका खोऱ्यात ७५% विश्वासार्हतेने ८८८.६६ दलघमी व दमणगंगा खोऱ्यात १४७८.८८ दलघमी पाणी कोंकण भागात उपलब्ध आहे.

(२) समितीच्या अहवालानुसार उपलब्ध पाण्यापैकी गिरणा खोऱ्यात कोकण भागातून उपसा करुन पाणी वळविण्यासाठी पश्चिम वाहिनी नदीखोऱ्यात १३ धरणे बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर धरणांची ३ लिंक्समध्ये विभागणी करण्यात आली असून प्रस्तावित एकूण ३६२.६२ दलघमी (१२.८० टीएमसी) पाणीसाठयापैकी स्थानिक वापर व बाष्पीभवन व्यय ५८.०२ दलघमी (२.०५ टीएमसी) वगळता गिरणा खोऱ्यात ३०४.६० दलघमी (१०.७५ टीएमसी) पाणी उपसा करुन वळविण्याचे प्रस्तावित आहे.

नार-पार-गिरणा जोड योजनेच्या सुधारित पूर्व संभाव्यता अहवालानुसार (Pre-feasibility Report) पश्चिम वाहिनी नदीखोऱ्यात १३ धरणे बांधण्याचे प्रस्तावित असून या १३ धरणांचे सर्वेक्षण अन्वेषणाचे काम वॅपकॉस (Water & Power Consulltancy Services) इंडिया लि. (भारत सरकार उपक्रम) या अभिकरणामार्फत करण्यात येत आहे. उक्त प्रश्नात नमूद केल्यानुसार स्थानिक सर्वेक्षण झालेल्या योजनांचे नव्याने सर्वेक्षण करुन पैश्याचा अपव्यय होत आहे अशी वस्तुस्थिती नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडशेत वावे (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथे धरण बांधण्यासाठी जमिनी संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३५) * ११२०१८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील वडशेत वावे येथे धरण बांधण्यात येत असून त्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनी संपादित करण्यात आलेल्या असताना सदरहू धरणाचे काम बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर धरणासाठी जमिनी संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना नविन निकषांप्रमाणे नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) वडशेत वावे लघु पाटबंधारे प्रकल्पाकरिता एकूण ७५.४८.२ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून त्यापैकी धरणाचे बुडीत क्षेत्र, धरण पायथा, सांडवा, पुच्छ कालवा व संलग्न कामासाठी तीन गावांतील एकूण ३३.६६.९ हेक्टर खाजगी जमिन संपादित करण्यात आली आहे.

सदर धरणाच्या बुडीत क्षेत्रातील एकूण ६.०२.८ हेक्टर वन जमिनीची आवश्यकता असून सदर वन जमिनीचे निर्वनीकरण न झाल्याने धरणाच्या घळभरणीचे काम झाले नाही.

(३) भूसंपादन निवाडा विशेष भूसंपादन अधिकारी यांनी तत्कालीन निकषानुसार मंजूर केला आहे. मोबदला वाटप दिनांक २७/०४/२०१० ते दिनांक ०७/०५/२०१० दरम्यान करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जननी शिशु सुरक्षा योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(३६) * १०५११७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर),**

**श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माता मृत्यू व बालमृत्यूंचा दर घटविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत जननी शिशु सुरक्षा योजना माहे ऑक्टोबर, २०१२ पासून लागू करण्यात आलेली असतानाही सन २०१६-१७ या वर्षात राज्यभरात मातामृत्युचे प्रमाण १ हजार ३५८ पेक्षा जास्त झाल्याची नोंद आरोग्य विभागात झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचबरोबर आरोग्य विभागाशी संबंधित २३ जिल्हा रुग्णालयात या योजनेची अंमलबजावणी होत असताना मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांत प्रसूतीसाठी आलेल्या महिलेच्या नातेवाईकांना शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि औषधे खाजगी औषधांच्या दुकानातून विकत घेण्याचे डॉक्टर सल्ला देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे माता व बालमृत्युंवर नियंत्रण आणण्यासाठी व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांत सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जननी शिशु सुरक्षा ही योजना राज्यात दि. ७ ऑक्टोबर, २०११ पासून सुरु केली आहे. सन २०१६-२०१७ मध्ये १२२९ माता मृत्यु झाले असून सन २०११-२०१२ च्या तुलनेत सन २०१६-२०१७ मध्ये माता मृत्युंच्या संख्येत २१७ अंकानी घट झालेली आहे.

(२) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये आलेल्या महिलांच्या नातेवाईकांना शस्त्रक्रियेचे साहित्य आणि औषधे खाजगी मेडिकल स्टोअर्समधून विकत घेण्याचा सल्ला दिला जात नाही. तसेच प्रसूतीसाठी आलेल्या महिलांना या योजनेअंतर्गत मोफत उपचार दिले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंजर्ले (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील कड्यावरील गणपती या पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत

**(३७) * ११००७८ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आंजर्ले कड्यावरील गणपती हे कोकणातील समुद्र किनाऱ्यालगतचे पर्यटन स्थळ असून येथे दरवर्षी २० ते २५ लाख भाविक व पर्यटक पर्यटनासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी रस्ते, शौचालय, पथदिवे, पर्यटकांना बसण्याची व्यवस्था इत्यादी पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधांच्या कामांसाठी शासनाने निधी उपलब्ध केला नसल्याने पर्यटकांची गैरसोय होत असल्याने या सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने सदर ठिकाणी पहाणी केली आहे काय व त्यानुसार पर्यटणासाठी आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करुन या जागेचा उत्तम दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) जिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार गेल्या दोन वर्षात अंदाजे २० ते २५ लक्ष पर्यटकांनी भेट दिलेली आहे.

(२) आंजर्ले कड्यावरील गणपती येथे पर्यटनाच्या दृष्टीने मुलभूत सुविधा व इतर सुविधा होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना शासन स्तरावरुन आदेश देण्याबाबत लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.२२/१/२०१८ चे पत्र जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना पाठविण्यात आले असून त्यांचा अहवाल प्रतीक्षाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किरकीटवाडी ते नांदोशी (ता.हवेली, जि.पुणे) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३८) * १०५१०० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किरकीटवाडी ते नांदोशी (ता.हवेली, जि.पुणे) या रस्त्यावर अवजड वाहनांची सतत वर्दळ असल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावरून प्रवास करणे धोकादायक झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील वाढते नागरीकरण व बांधकामे यामुळे रस्त्यावर अवजड वाहनांना बंदी घालून रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याबाबतचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी, पुणे यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार किरकीटवाडी ते नांदोशी या रस्त्यावर अवजड वाहनांना बंदी घालून तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(४) जिल्हाधिकारी, पुणे यांना प्राप्त झालेले निवेदन पुढील कार्यवाहीसाठी पोलिस आयुक्त व पोलिस अधिक्षक ग्रामीण, पुणे यांना पाठविण्यात आले आहे.

किरकीटवाडी ते नांदोशी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.४११ असून त्याची एकूण लांबी ३.५० कि.मी.आहे. या रस्त्याचा पृष्ठभाग डांबरी/ अल्पप्रमाणात कॉंक्रीट असा आहे.

सदर रस्त्याच्या कि.मी.०/४२० ते ०/५०० या अंतरामध्ये मोठ्या ग्रामपंचायतींना विशेष अनुदान या लेखाशिर्षांतर्गत रु.१०.०० लक्ष चे कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कि.मी.०/० ते

०/४२० या अंतरामध्ये रस्ते किरकोळ दुरुस्ती जिल्हा परिषद निधी अंतर्गत रु.३.०० लक्ष चे डांबराने खड्डे भरण्याचे काम मंजूर करण्यात आले आहे. उर्वरित लांबीसाठी निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयात दोन वर्षाच्या कालावधीत १७१ रुग्णांना हत्तीरोगाची बाधा झाल्याबाबत

**(३९) * ११०५५३ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१७ या दोन वर्षाच्या कालावधीत २ लाख ४४ हजार ३० नागरिकांच्या रक्त नमुन्यांची तपासणी केली असता १७१ रुग्णांना हत्त्तीरोगाची बाधा झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयातील रुग्णांची पाहणी शासनाने केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, तद्नुसार हत्तीरोग नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे,

नांदेड जिल्हयात दि.१ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१७ या दोन वर्षाच्या कालावधीत २०४४३० रक्तनमुने गोळा करुन त्यापैकी १७२५४१ रक्तनमुन्याची तपासणी केली असता हत्तीरोगाचे १७१ रक्तनमुने दुषित आढळुन आले आहे.तसेच वरिल १७१ दुषित रुग्ण हे हत्तीपाय या रोगाचे रुग्ण नसुन सदरहू रुग्णाच्या रक्तात मायक्रोफायलेरीया या नावाचे जंतु आढळून आल्याने त्यांना १२ दिवसाचा समुळ उपचार देण्यात आला. त्यामुळे त्यांच्या रक्तातील जंतु नष्ट होतात त्याअनुषंगाने सदरहू रुग्णाचा दर सहा महिन्याने

फॉलोअप रक्तनमुने घेवुन तपासली जातात. त्यामुळे त्यांना भविष्यात हत्तीरोगाची बाधा होत नाही.

(२) नांदेड जिल्हा हा हत्तीरोगासाठी संवेदनशील असुन या जिल्हयात शासनामार्फत समस्याग्रस्त भागात आठ हत्तीरोग उपपथके व दोन रात्रचिकित्सालय कार्यान्वित आहेत. या पथकामार्फत नियमित कार्यवाही राबवुन नागरिकांचे रक्तनमुने घेणे, तपासणी करुन दुषित आढळुन आल्यास संपुर्ण उपचार करण्यात येतो. तसेच संपुर्ण जिल्हयात हत्तीरोग एकदिवसीय सामुदायीक औषधोपचार मोहिम दरवर्षी राबविण्यात येते.यामध्ये हत्तीरोग असो किंवा नसो सर्व पात्र लाभार्थ्याना डिईसी व अलबेडाझॉल गोळयाचा एक डोस देण्यात येतो. सन २०१० पासुन नांदेड जिल्हयामध्ये हत्तीरोगाच्या नियंत्रणासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यामुळे जिल्हयाचा एम.एफ रेट १ टक्क्यापेक्षा कमी आढळून आलेला आहे.

(३) नांदेड जिल्हयात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव दुर करण्यासाठी नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाय योजना हत्तीरोगावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी खालील प्रतिबंधात्मक उपाययोजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

• उपपथक व रात्र चिकित्सालयामधील कार्यरत असलेल्या कर्मचारीमार्फत रात्रीचे सर्व्हेक्षणामध्ये प्रत्यक्षात घरोघरी भेटी देवून रक्तनमुने गोळा करणे.

• रक्तनमुन्याचे हत्तीरोग नियंत्रण पथकाच्या प्रयोगशाळेत तपासणी करुन दुषित रक्त नमुने रुग्णास १२ दिवसाचा समुळ उपचार देणे

• दर सहा महिन्यानी फॉलोअप रक्त नमुने घेऊन ते तपासले जातात व दुषित रुग्णास समुळ उपचार देणे.

• किटक समांहाराकामार्फत डास गोळा करणे व त्या डासाची वर्गवारी करुन डास घनता काढणे

• क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत खड्डे, नाल्या व सखल भागामध्ये अळीनाशकाची फवारणी दर आठ दिवसांनी करणे.

• कायमस्वरुपी डासोत्पत्ती स्थानामध्ये दर शनिवारी गप्पीमासे सोडणे.

• नांदेड जिल्हयात प्रा.आ. केंद्र (सर्व) यांच्यामार्फत अंडवृध्दी रुग्णास शस्त्रक्रिया करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत असुन, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी दरमहा नियमित शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत

• हत्तीपाय रुग्णांना बाधीत अवयवाची निगा राखणे व मलमपट्टी (मॉर्बीडीटी मॅनेजमेंट) याबाबतचे प्रशिक्षण नियमित देण्यात येत आहे.
• हत्तीरोग नियंत्रणासाठी विशेष उपक्रम (एमडीए मोहिम) राबविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताकारी, दुधारी, रेठरे, हरणाक्ष व भवानीनगर (जि.सांगली) या गावांचा लाभक्षेत्रामध्ये समावेश करण्याबाबत

**(४०) * ११४४७५ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प ताकारी योजना टप्पा क्र. २ मध्ये ताकारी, दुधारी, रेठरे, हरणाक्ष, भवानीनगर या गावांचा लाभक्षेत्रामध्ये समावेश करण्याबाबत शेतकऱ्यांनी, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री व जलसंपदा विभाग, सांगली यांच्याकडे गेली दोन वर्षापासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त गावांचा लाभक्षेत्रामध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) प्रस्तुत मागणीनुसार ताकारी, दुधारी, रेठरे, हरणाक्ष, भवानीनगर गावातील २६० हे. अतिरिक्त सिंचन क्षेत्रास लाभ देण्याबाबतच्या समावेशासह कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय अहवालास शासन निर्णय दि.०२/०८/२०१७ अन्वये मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील आठ गावांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याबाबत

**(४१) * ११०८६८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील उमरी मध्यम प्रकल्पातंर्गत सिंचनाला सुरुवात झाली असतांनाही सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील आठ गावे सिंचनापासून वचिंत असल्यामुळे उमरी प्रकल्पातंर्गत खापा लघु कालव्याचे विस्तार व सुधारणा करून सदर आठ गावांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी अधिक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर यांना दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी व त्यासुमारास वारंवार निवेदन दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सावनेर तालुक्यातील आठ गावांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्यासाठीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देवून निधी देण्यासह उमरी प्रकल्पातंर्गत खापा लघु कालव्याचे विस्तार व सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) उमरी, ता. सावनेर या मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालवा दुरुस्तीचा प्रस्ताव शासन निर्णय दि. १९/१२/२०१७ मधील तरतुदी नुसार राज्य तांत्रिक सल्लागार समिती मार्फत शासनास फेरसादर करण्याच्या सूचना शासनाने दि.११/०१/२०१८ रोजी क्षेत्रिय स्तरावर दिलेल्या असून त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पेवे, खरेकोंड व अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील बायोगॅस सयंत्र नादुरूस्त असल्याबाबत

**(४२) * १०५७९६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पेवे, खरेकोंड व अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे सन २०१२-१३ या वर्षात पंचायत समिती, गुहागर यांचे माध्यमातून आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या कर्जरूपी अर्थसहाय्यातून १३ पेक्षा अधिक बायोगॅस सयंत्र बसविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बायोगॅस तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याने ते व्यवस्थित चालत नसल्याच्या तक्रारी सुरूवातीपासूनच लाभार्थ्यांनी पंचायत समिती, गुहागर यांचेकडे केली असताना त्याची दखल न घेतल्याने आता संबंधित लाभार्थ्यांना बँकेकडून कर्जवसुलीसाठी नोटिसा आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार लाभार्थ्यांची कर्ज माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) १००% केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्हयातील गुहागर तालुक्यातील मौजे पेवे, खरेकोंड येथे ६ व अंजनवेल येथे ७ असे एकूण २ घनमीटर क्षमतेची १३ बायोगॅस सयंत्र हेम सिमेंट प्रोडक्ट, मु.पो. बुधगांव, ता. मिरज, जि. सांगली यांचेमार्फत रू. ३२५००/- प्रति संयंत्र याप्रमाणे सन २०१२-१३ मध्ये बसविण्यात आली आहेत.

पंचायत समिती, गुहागर यांचेकडून सदर बायोगॅस कार्यान्वित झाल्याची खातरजमा करून रू. ८०००/- प्रति संयंत्र व शौचालय जोडलेल्या संयंत्रास रू. १०००/- अतिरिक्त अनुदान संबंधित लाभार्थ्यांना देण्यात आले आहे. उर्वरित रक्कमेसाठी लाभार्थ्यांनी विदर्भ कोकण ग्रामीण बँकेडून कर्ज घेतलेले आहे. कंपनीकडून सदर संयंत्राचा दोन वर्षाचा हमी कालावधी देण्यात आला होता. तथापि हमी कालावधीतच वरील प्रमाणे बसविण्यात आलेले संयंत्र नादुरूस्त

झाल्यामुळे पंचायत समिती व लाभार्थ्यांमार्फत कंपनीस कळविण्यात आले. तदनंतर कंपनीच्या प्रतिनिधींनी किरकोळ दुरूस्त्या करून दिल्या. तथापि सदरची बायोगॅस संयंत्रे दुरूस्त झाली नाहीत. सदर संयंत्रे नादुरूस्त असल्यामुळे लाभार्थ्यांकडून याचा वापर झाला नाही व बँकेचे कर्ज परतफेड न झाल्यामुळे बँकेने त्यांना वसुली नोटीस बजावलेल्या आहेत.

याबाबत संबंधित कंपनीचे व्यवस्थापक व संबंधित लाभार्थी यांची पंचायत समितीस्तरावर दिनांक ०९.११.२०१७ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये लाभार्थी यांनी बायोगॅस सयंत्र दुरूस्त करून देणेबाबत व बँकेच्या थकीत रक्कमेवरील व्याज कंपनीने देणेबाबत मागणी केली. हेम सिमेंट प्रोडक्ट कंपनीच्या प्रतिनिधीने हमी कालावधीत संबंधित लाभार्थ्यांना बायोगॅस सयंत्र दुरूस्तीची सेवा पुरवलेली असल्याने बँकेच्या थकीत रक्कमेवरील व्याज भरण्यास नकार दिला. तथापि बायोगॅस सयंत्र दुरूस्त करून देण्याचे मान्य केले आहे.

-----------------

## निम्न दुधना (ता.सेलू, जि.परभणी) प्रकल्पाच्या तृतीय सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(४३) * ११२२५२ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न दुधना (ता.सेलू, जि.परभणी) प्रकल्पाचे तृतीय सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या कार्यवाहीस्तव मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी महामंडळास सादर केला असून सदरहू प्रस्तावाची राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने केलेल्या छाननीनंतरची किंमत रुपये २३४१.६७ कोटी एवढी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने शिफारस केली असून अद्यापपर्यंत सदरहू प्रस्तावास गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद या महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू प्रस्तावानुसार निम्न दुधना प्रकल्पाचे धरण, भूसंपादन, कालवे व वितरण व्यवस्थेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) नाही.

शासन निर्णय क्र. सुप्रमा२०१६/(४४३/२०१६)मोप्र-२, दिनांक १३/१०/२०१६ अन्वये निम्न दुधना प्रकल्पास रु.२३४०.६७ कोटी किंमतीसाठी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.
(३) सदर प्रकल्प प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेअंतर्गत प्रगतीपथावर असून प्रकल्पाची लाभक्षेत्र विकास सह संपूर्ण भाग-१ कामे जून, २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये अनुक्रमे रु.४५२.४३ कोटी व रु.१००.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिवरा गडलिंग (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील सिंचन तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४४) * १०६८७६ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील हिवरा गडलिंग येथील सिंचन तलावाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून कामात अनियमितता असल्याने या कामाची चौकशी करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान संबधित अधिकाऱ्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच या सिंचन तलावासाठी ज्या शेतकऱ्यांच्या शेत जमिनी संपादीत करण्यात आल्या त्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत जमिनींचा मोबदला दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सिंचन तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांवर कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना त्यांच्या संपादीत केलेल्या शेतजमिनींचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सिंचन तलावासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनीचा पुर्ण मोबदला शेतकऱ्यांना देण्यात आलेला आहे. तसेच हिवरा गडलिंग येथील पाझर तलावासाठी संपादित जमिनीचा मोबदला देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) सदर सिंचन तलावाच्या कामाची चौकशी केली असता कामात कुठलीही अनियमितता झाली नसल्याचे आढळुन आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताकारी, टेंभू आणि म्हैसाळ (जि.सांगली) योजनांची वीज देयके थकीत असल्याबाबत

**(४५) * १०८२६९ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील ताकारी, टेंभू आणि म्हैसाळ योजनेची पाणीपट्टी १३० कोटीवर गेली असून ६६ कोटीचे वीज देयके थकीत असल्याने सदरहू योजना बंद करण्यात आल्याने या सिंचन योजनांचे आवर्तन लांबल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टंचाईच्या काळातील ताकारी, म्हैसाळ व टेंभू योजनांची वीज देयकांची रक्कम १६ कोटी रुपये असून ती भरण्यासाठीचा जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे पाठविण्यात आलेला प्रस्ताव शासनाकडे निर्णयाअभावी प्रलंबित

असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी पाणीपट्टी भरली नाही त्यांच्या ७/१२ उताऱ्यावर भार चढविला जाणार असून आतापर्यंत किती शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर भार चढविण्यात आला आहे,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयाने पाठविलेल्या प्रस्तावाला मंजूरी देऊन ताकारी, टेंभू आणि म्हैसाळ योजनेची वीज देयके भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) म्हैसाळ योजनेतंर्गत मिरज व कवठेमहांकाळ तालुक्यातील अंदाजे १३६७८ लाभधारक शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर म.पा. अधि. १९७६ मधील ८८.२ नुसार सन २०१३-१४ अखेर रु.१२.३३ कोटी थकबाकी दाखविण्यात आली आहे.

ताकारी व टेंभू योजनेच्या थकबाकीवर कार्यवाही केलेली नाही.

(४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.०४/०१/२०१८ अन्वये रु.१४.१३ कोटी मधून ताकारी योजनेचे रु.२.५६ कोटी व पाणीपट्टी रकमेतून रु.२.६२ कोटी (एकूण रु.५.१८ कोटी) आणि टेंभू उपसा सिंचन योजनेचे रु.६.०७ कोटी व पाणीपट्टी रकमेतून रु.५.०० कोटी (एकूण रु.११.०७ कोटी) विद्युत देयके महावितरण कंपनीकडे भरणा केली आहे.

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचा खंडीत विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यासाठी किमान रु.१७.०० कोटी विद्युत देयके महावितरण कंपनीकडे भरणे आवश्यक आहे.

तथापि सद्य:स्थितीत रु.५.५० कोटी इतका निधी उपलब्ध आहे. लाभधारकांकडील पाणीपट्टीची किमान रु.११.५० कोटी रक्कम भरणा केल्यावरच योजनेचे आवर्तन सुरु करता येणार आहे.

(५) म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या लाभधारकांकडून थकीत पाणीपट्टी वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाबाबत**

**(४६) * १०६२०८ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम मागील ५ ते ६ वर्षापासून प्रलंबित असून कामाचा दर्जाही निकृष्ट असल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासह निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सदर ग्रामीण रूग्णालयाच्या इमारतीचे हस्तांतरण करून घेण्याच्या दृष्टीने इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता, इमारतीमध्ये काही त्रुटी व बांधकाम अपूर्ण असल्याचे आढळले. त्यामुळे, सदर इमारती मधील त्रुटींची पूर्तता करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे. तसेच, सदर बांधकामाबाबत, गुणवत्ता व दक्षता नियंत्रण कक्षाकडून तपासणी करून घेण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

(३) सदर इमारतीमधील त्रुटींची पूर्तता करण्याबाबत आणि बांधकामाचा दर्जा तपासण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मुळे ग्रामपंचायत हद्दीतील नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(४७) * १०८५७७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मुळे ग्रामपंचायत हद्दीतील मुळे येथील नदीवर पूल नसल्यामुळे पावसाळ्यात तेथील ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना सुमारे १० किलो मीटरचा वळसा घालून मुलभूत सुविधांसाठी शहरी ठिकाणी यावे लागते तसेच असणारा रस्ताही अरूंद असल्यामुळे वाहतुकीस गैरसायीचे होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळे येथील नदीवर पूल बांधल्यास तेथील ग्रामस्थांना गोंधळपाडा मार्गे कमी वेळात व कमी अंतरात शहरी ठिकाणी येण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी करूनही सदर पूल बांधण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुळे येथील नदीवरील पूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे. प्रश्नांकित अलिबाग रेवस मार्ग ते बामणगाव मुळे या १.०० कि.मी. लांबीच्या ग्रामीण मार्ग क्र.४९ या रस्त्यावर पुल बांधणेची आवश्यकता आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) उपरोक्त ग्रामीण मार्ग क्र.४९ हा १.०० कि.मी. लांबीचा रस्ता सद्यस्थितीत मातीचा कच्च्या स्वरुपाचा आहे. सदरहू ठिकाणी पुल बांधकाम करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांच्यामार्फत नाबार्ड कर्जसहाय्य योजनेअंतर्गत आर.आय.डी.एफ. २२ अंतर्गत रु.१००.०० लक्ष चा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोकण भवन नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा नियोजन विभागास उपलब्ध असलेला कोट्यवधी रुपयांचा निधी अखर्चित असल्याबाबत

**(४८) * ११००८२ श्री.संजय कदम (दापोली), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा नियोजन विभागास उपलब्ध असलेला सुमारे १४० कोटी रुपयांचा निधी अद्यापही अखर्चित असून सन २०१७-१८ या वर्षाकरिता प्रत्यक्षात कोणताही निधी खर्च करण्यात आला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीमधून रस्ते, साकव, आरोग्य पशुसंवर्धन, मत्स्यसंवर्धन, शाळा खोल्या दुरुस्ती, स्मशानभुमी इत्यादी कामे करणे अपेक्षित असताना वर्षभरात नियोजन न करता निधी खर्च न केल्याने या कामांवर परिणाम झाला असून हा निधी शासनाकडे परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह निधी विकास कामांकरिता खर्च व्हावा याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ करीता रु.१७०.९९ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक ३०.०६.२०१७ मधील सूचनांनुसार महसूली व भांडवली खर्चाच्या मर्यादेनंतर रत्नागिरी जिल्ह्याला रु.१३९.७६ कोटी निधी उपलब्ध करण्यात आला आहे. त्यापैकी माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर रु.२९.८६ कोटी खर्च झालेला आहे.
(२) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांनी रस्ते, साकव, आरोग्य, पशुसंवर्धन, मत्स्यसंवर्धन, शाळा खोल्या दुरुस्ती, स्मशानभूमी इत्यादी कामांकरीता माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर रु.८६.९५ कोटी

निधी वितरीत केलेला आहे. सदर निधी मार्च,२०१८ अखेरपर्यंत खर्च करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील बंधाऱ्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४९) * ११०२४० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयाचा स्वतंत्र सिंचन अनुशेष मंजूर झाल्यानंतर जिल्हयात सिंचनासाठी बंधाऱ्यांच्या कामाबरोबर पाझर तलावांचेही कामे सुरु करण्यात येणार असल्याने लघुपाटबंधारे विभाग स्थानिक स्तर व लघुसिंचन विभागाकडून सुमारे ६० पेक्षा अधिक कामाचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात व पुढील आर्थिक वर्षात जिल्हयात एकूण ८ कामे पूर्ण करण्यासाठी सुमारे ९ कोटी रूपयांच्या निधीची मागणी औरंगाबाद लघुसिंचन मंडळ कार्यालयाने ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडे केली असून सदर कामे माहे मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करावयाची असल्याने या कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) सन २०१७-१८ साठी रु.२००.०० लक्ष इतकी तरतूद शासन निर्णय दिनांक २३/१/२०१८ अन्वये वितरित करण्यात आली असून उर्वरित निधीची तरतूद सन २०१८-१९ या वर्षामध्ये करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अतिदुर्गम व पहाडी भागातील धनगरवाड्यांमधील पाणीटंचाईबाबत

**(५०) * १११५६० श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अतिदुर्गम व पहाडी भागातील धनगरवाड्यांमधील पाणीटंचाईच्या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने मा.जलसंधारण मंत्री यांची माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान भेट घेतली असता या वाड्यांचा सर्व्हे करुन अहवाल सादर करण्याबाबत संबंधित विभागाला सूचना करुन पाणी टंचाईवर कायमस्वरुपी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ५८ वाड्यांपैकी २८ वाड्यामध्ये शासनाकडून येणाऱ्या निधीच्या माध्यमातून नळपाणी पुरवठा योजना, जुन्या असलेल्या विंधन विहीरींचे नुतनीकरण, पाणी साठवणीसाठी तळी तसेच जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून पाणी टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कार्यवाही करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला आहे काय व त्यानुसार धनगरवाड्यांमधील पाणीटंचाई दूर करणासाठी जलसंधारणाची आवश्यक कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अशी बाब आढळली नाही.

(२) होय.

(३) खेड तालुक्यातील अतिदुर्गम व पहाडी भागातील धनगरवाड्यातील २८ वाड्यांची पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद रत्नागिरी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत नियोजन करण्यात आले आहे. त्यानूसार ५ वाड्यांची कामे पूर्ण असून पुरेसे पाणी उपलब्ध होत असून ७ वाड्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

उर्वरित ६ वाड्यांकरीता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ च्या आराखड्यात कामे प्रस्तावित केली असून २ वाड्यांचा प्रस्ताव अतिवृष्टीच्या निधीमध्ये प्रस्तावित आहे. उर्वरित ८ कामांच्या मागणीचे ग्रामपंचायतीचे प्रस्ताव प्राप्त व्हावयाचे आहेत. सदर प्रस्ताव प्राप्त होण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा करण्यात येत आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.